D:\D V Tungar\Confirmation\CONFIRMATION- 2024 PENSION docx / 12-Dec-24 /Page | 1 |

# महाराष्ट्र शासन
# महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
## कार्यालय- फुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी


दुरध्वनी क्र. ०२४२६-२४३२१६
फॅक्स क्र. ०२४२६-२४३८१६
ई-मेल registrar.mpkv@nic.in

पत्ता :- मध्यवर्ती परिसर, प्रशासकीय इमारत,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, ता. राहुरी,
जि. अहमदनगर. पिन- ४१३ ७२२.


ई-मेल द्वारे

जा.क्र.प्रशासन-ड/स्थायीकरण/सेनिवे/४१९८/२०२४ दिनांक: १२ /१२/२०२४

वाचा :
१. सचिवालय, मुंबई, निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, १९७५
२. विद्यापीठ ठराव क्र.एमटीजी-२(५२)/७६/४५५३ दिनांक २०.७.७९.
३. विद्यापीठ शुध्दीपत्रक क्र.एमटीजी-२(५२)/१२७१/८१ दिनांक १७.२.९१.
४. शासन परिपत्रक क्रमांक/स्थाप्रप-१०९३/२६४०/प्र.क्र.९८/९३/१३-अ, मंत्रालय, मुंबई, दिनांक १६ डिसेंबर, १९९५
५. शासन निर्णय क्रमांक :सेनिवे १००७/६२/सेवा-४, मुंबई दि. ४ जानेवारी, २००८.
६. विद्यापीठ परिपत्रक क्र.मफुकृवि/प्रशासन/सेनिवे/३८३/२००८ दि. ७.३.२००८
७. विद्यापीठ परिपत्रक क्र.प्रशासन-ड/स्था.प्र./१९७/०९, दिनांक ५.२.२००९.
८. शासन परिपत्रक क्रमांकःस्थाप्रप-१४१५/(प्र.क्र.१४/१५)/१३-अ दि.१९.०९.२०१७

## स्थायित्व प्रमाणपत्र

उपरोक्त संदर्भ क्र. ८ परिशिष्ट अ मधील अ.क्र. ३ मध्ये नमूद केल्यानुसार सेवानिवृत्तीवेतनार्ह पदावर कार्यरत असलेल्या एखाद्या अधिकारी / कर्मचाऱ्याचे सेवेत असताना निधन झाले असेल व केवळ स्थायित्व लाभ प्रमाणपत्रा अभावी त्याच्या कुटुंबास सेवानिवृत्तीच्या अनुषंगिक लाभांपासून वंचित रहावे लागत असेल, तर अशा प्रकरणी स्थायित्व लाभ प्रमाणपत्रासाठी विहित केलेल्या अटी व शर्तीपैकी ज्या शर्तीची पूर्तता होत नसेल अशा शर्तीपासून त्याला सूट देण्याचा निर्णय संबंधीत प्रशासकीय विभागास घेता येईल.

कै. श्रीमती सिताबाई रामा दोंदे, मजूर यांना मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दि.२१.०१.२००९ रोजी दिवाणी मृत घोषित केलेबाबत नमूद करण्यात आलेले आहे. कै. श्रीमती दोंदे या स्थायीकरणासाठी आवश्यक असलेल्या १. चारित्र्य संबधीचा अहवाल २. जात वैधता प्रमाणपत्र या बाबींची पुर्तता करत नसल्याचे दिसून येते.

याबाबत, मा. कुलगुरु यांचे मान्यतेने कै. श्रीमती सिताबाई रामा दोंदे, मजूर यांना मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दि.२१.०१.२००९ रोजी दिवाणी मृत घोषित केल्याने त्यांना स्थायीत्व लाभ प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेल्या १. चारित्र्य संबधीचा अहवाल, २. जात वैधता प्रमाणपत्र, या बाबींपासून सूट देण्यात येत आहे व त्यांना विद्यापीठाच्या सेवेत त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या पदावर व दिनांकापासून स्थायीकरणास पात्र म्हणून घोषित करण्यात येत आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०७५/दहा, दिनांक १९ सप्टेंबर, १९७५ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व शर्ती विवरणपत्रात नमूद करण्यात आलेल्या अस्थायी विद्यापीठ कर्मचा-यांच्या बाबतीत पूर्ण झालेल्या आहेत आणि त्यानुसार सदर कर्मचारी सर्व प्रयोजनार्थ विवरणपत्रात त्यांचे नांवासमोर स्तंभ-३ मध्ये नमूद केलेल्या पदांवरील स्तंभ-४ मध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून स्थायी शासकीय कर्मचारी म्हणून समजले जाण्यास पात्र आहेत. त्याचप्रमाणे असे ही आदेशीत करण्यात येते की, कै श्रीमती सिताबाई रामा दोंदे, सेवा निवृत्तीच्या फायद्यासाठी पात्र समजण्यात येत आहेत.

| अ. क्र. | विद्यापीठ कर्मचाऱ्यांचे नाव व सध्याचे पदनाम. सर्वश्री/श्रीमती | ज्या पदावर स्तंभ क्र.१ मधील कर्मचा-यांस स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात येते त्या पदाचे पदनाम. | कोणत्या दिनांकापासून देण्यात आले. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | कै. श्रीमती सिताबाई रामा दोंदे, माजी मजूर | मजूर | २२.०६.१९९७ |

कृ.मा.प.

सदरचे स्थायित्व प्रमाणपत्र आदेश हे विद्यापीठ सेवाहितार्थ निर्गमित करण्यात येत असुन, त्यांची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. तसेच, सदर स्थायित्व बाबतची नोंद संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे मुळ सेवा पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

**स्वाक्षरीत / -**
**कुलसचिव**

प्रत: माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव :

१. प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे), बियाणे विभाग, मफुकृवि., राहुरी
२. प्रभारी अधिकारी, कृषि माहिती व्यवस्थापण विभाग, मफुकृवि., राहुरी.
   २/- त्यांना निर्देशीत करण्यात येते की सदरील आदेश विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा.

प्रत: सर्व कार्यालय अधिक्षक, प्रशासन विभाग, मफुकृवि, राहुरी यांना माहितीसाठी
प्रत: सुरक्षा नस्ती.

**(विजय त्र्यं.पाटील)**
**उप-कुलसचिव (प्रशासन)**
**मफुकृवि, राहुरी**